# आदिवासी लोकगीते व कविता

**डॉ. एस. के. इंदोरकर**
राष्ट्रपिता महात्मा गांधी
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सावली, जि.चंद्रपूर

डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर १९६० पासून साहित्य विश्वात अमुलाग्र बदलांचा झंझावात सुरू झाला. आजपर्यंत मराठीत निर्माण झालेल्या साहित्यामध्ये आपापल्या समाजाचे प्रतिबिंब नव्याने उदयास येत असलेल्या लेखक, कवींना, साहित्यिकांना कुठेही दिसत नव्हते, जे दिसले ते फक्त अन्यायकारक, शोषण करणारे मानसिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा सर्व प्रकारचा अपमानित व माणूस म्हणून सर्वत्र हिणविले जाणारे चित्र साहित्यामध्ये अधोरेखित केले गेले होते. परंतु बाबासाहेबाच्या परिवर्तनवादी विचारामुळे व १४ ऑक्टोबर १९५६ ला घेतलेल्या बौद्धधर्मांतरणामुळे एकूणच १९६० च्या दशकात वैचारिक क्रांतीचे वादळ उठले. स्वप्नवत व काल्पनिक विचारविश्वाला छेद देत मानवकेंद्रीभूत असणारी व मानसाला सर्वांगाने मोठी करणारी वैचारिकता उदयास आली. यात आंबेडकरवादी साहित्याची भूमिका लाख मोलाची आहे. त्यामागून आलेले ग्रामीण, आदिवासी, जनवादी, स्त्रीवादी, मुस्लीम साहित्यातील विचारवंतांनी परिवर्तनवादी साहित्याच्या समुहात सहभागी होऊन आपापली भूमिका मांडायला सुरूवात केली. प्रस्थापित साहित्याला नाकारून मानवी समुहाकडे बघण्याची मानवीयता बहाल केली. आपापल्या समाजाच्या वेदना, दु:ख, प्रश्न साहित्यामधून प्रकट व्हावे या हेतूने हे प्रवाह सुरू झाले. आपल्या कोंडलेल्या श्वासाला मोकळी वाट करून देण्यासाठी प्रवाह पतीत मूल्यांवर जोरदार हल्ले चढविले.

आदिवासी साहित्याच्या प्रेरणांच्या संदर्भात डॉ. माहेश्वरी गावित म्हणतात, ''आदिवासी साहित्य १९६० नंतर उदयास आले व १९७५ नंतर ते खऱ्या अर्थाने पुष्ठ होत गेले. आदिवासी साहित्याचा परामर्ष घेतला तर दलित साहित्याचा प्रवाह पुष्ठ झाल्यानंतर काहिशा अनुकरणात आदिवासी साहित्यातील साहित्यकृती आलेल्या दिसतात. हळूहळू ही अनुकरणात्मकता झटकून दिलेली किंवा झडून गेलेली पाहावयास मिळते'' हे विधान आदिवासी साहित्याच्या प्रेरणेच्या संदर्भात चिंतनीय आहे. दलित साहित्याच्या उदयानंतर विविध छोटे मोठे साहित्य प्रवाह निर्माण झाले. दलित साहित्य चळवळीमुळे छोटया मोठया प्रवाहांना दिशा आणि बळ मिळाले हे नाकारता येत नाही. मानव्याची प्रतिष्ठा, व्यसनमुक्ती, न्याय आणि समतेवर आधारित सामाजिक रचना हेच दलित साहित्याचे उद्दीष्ट आहे. यापेक्षा वेगळी भूमिका आदिवासी साहित्याची असेल असे वाटत नाही.

आदिवासी साहित्य प्रवाहामध्ये कथा, कादंबरी, नाटक, स्वकथन, कविता इत्यादी मध्ये लेखन केले तरी पण मोठया प्रमाणात व सकस साहित्य अजूनही होणे आहे. तसेच कवितेच्या बाबतीतही फारसे लेखन आढळून येत नाही. आदिवासी कविंमध्ये भूजंग मेश्राम, वाहरू सोनवाणे, विनायक तुमराम, माधव सरकुंडे, सुनिल कुमरे, वाल्मिक शेडमाके, वसंत कुलसंगे, पुष्पकुमार चांदेकर, प्रभु राजगडकर, उषाकिरण आत्राम, कुसुम अलाम, पुरूषोत्तम शेडमाके, चामुलाल राठवा इत्यादी कवींनी आदिवासी कविता प्रांत समृद्ध केला तरीपण आदिवासी कवितेला अजुनही बराच मोठा पल्ला गाठावयाचा आहे.

आदिवासी लोकसाहित्य म्हणजे आदिवासीतील पारंपरिक लोकजीवन पद्धती होय. त्यांची अभिव्यक्ती, लोकश्रद्धा, रूढी, परंपरा, आचारविचार, समजुती तसेच विविध कला प्रकार आणि मौखिक स्वरूपातील आविष्कार यासांरख्या बाबींचा समावेश त्यांच्या साहित्यात होतो. निसर्ग पूजन हे आदिवासींचे प्रमुख वैशिष्ट्य. निसर्गातील अनाकलनीय घटनांना त्यांनी पूजनीय मानले. वीज, सूर्य, चंद्र, तारे, जंगल प्राणी अशा कितीतरी नैसर्गिक क्रिया कलापांचे व प्राण्यांचे ते पूजन करतात. तसेच हिंदू धर्मातील देव–देवतांची सुद्धा पुजा करतात. आदिवासी समाज स्वच्छंदपणे जीवन जगतांना दिसतो. निसर्गावर प्रेम करीत करीत निसर्गातील बदलांच्या मध्ये स्वत:ला सामावून घेत ते मनमुराद आनंद लुटतात. विविध प्रकारच्या समारंभामधून, सण उत्सवातून नृत्य व गीताद्वारे आपल्या भावना ते व्यक्त करीत असतात.

आदिवासी स्त्रीगीतेही बहुरंगी आणि बहुढंगी स्वरूपाची आहेत. विविधता आणि विपुलता हे आदिवासी लोकगीतांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. स्त्री गीतामधून त्यांचे वेगळेपण अनुभवावयास मिळते. त्यातील उपमा प्रतिमा, दृष्टांतामुळे त्यांच्या लोकगीतांना एक प्रकारची नादमयता प्राप्त झाली आहे. त्यांची लोकगीते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत प्रवाहित झाल्यामुळे त्यातील परिणामकारकता कायम राहिली आहे. सामाजिक रूढी, जन्म, संस्कार यामधून आदिवासी स्त्री संस्कारित होते. अशा कोणत्याही प्रसंगी लोकगीते गायली गेलेली आहेत. स्त्री ही मुलगी, पत्नी, आई, ननंद, भावजय, सुन, सासू आदी अशा विविध भूमिका पार पाडीत असते. वयाबरोबरच संस्कारित झालेल्या मनातून लोकजीवनातील रूढीने आलेले लोकगीते साकार होतात. लोकगीतांचे निर्मिती मौखिक परंपरेने झालेली आहे.

“आंब्या मोवूरा मोवूरा कधी येशी!
भाऊ नवरा, नवरा कधी होशी ।”

यामधून आदिवासी स्त्रीच्या मनातील आपल्या भावाविषयी प्रेम, जिव्हाळा, आत्मीयता व्यक्त होताना दिसते. त्यांचा प्रत्येक सण उत्सव नाचगाण्याने साजरा होतो. नाशिक व ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीमध्ये मृत्यूच्याही प्रसंगी लोकगीते म्हटली जातात. ती पुढीलप्रमाणे,

“चंदा रे सुर्या नमू लागल्या।
ढगे सर देवा नमू लागल्या ।
जुगा जातीला नमू लागल्या ।
ताडेसर देवा , थाडेसर देवा,
बलया देवा नमू लागलं ।
लंका रामाला नमू लांगलं”

अशाप्रकारे मृत्यूसमयी गाणे म्हणून देवाची आळवणी केली जाते.

आदिवासी स्त्रीला संपूर्ण जीवन दऱ्या खोऱ्यात, जंगल, पहाडात, निसर्गाच्या सान्निध्यात आत्यंतिक गरिबीत जीवन जगावे लागते. अन्न, वस्त्र, निवाऱ्यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. दु:ख, यातना, कष्ट सहन करीत करीत तीची वाटचाल चालू आहे. कधी कुठे तक्रार नाही, किंवा आक्रोश नाही. विविध प्रसंगी कष्टावर मात करून त्या आनंद लुटतात. तरूण–तरूणी एकमेकांच्या हातात हात घालून बेभान होतात. तेव्हा त्यांची लय, ताल मनाला हर्षोल्लित करते.

“सासरजीने आंगने काय मागे बंदडा ।
रूमाल मागे बंदडा काय रूमाल मागे बंदडा ।

सोनाली अंगडी रूमाल मागे बंदडा ।
सासुनी आंगन मे काय मागे बंदडा ।
चांदानी पट्टा रूमाल मागे बंदडा ।''

या गीतामधून नवरा मुलगा आपल्या सासऱ्या कडून काय काय मागतो याचं वर्णन केलेले आहे.

वारली लोकगीतामधून वारली माणसाची एकूणच दयनीय अवस्था झाली आहे. याची प्रचिती येते.

''जियाची काडी गेली सुकून
वेलींचा वासा गेला खूडून
भाजीचा माडा गेला कोमून
तशी र चर्या गेली कोमून .........''

भावना प्रधानता हा आदिवासी लोकगीतांचा अंग आहे. त्याचा वारंवार प्रलय घडतो. विवाहानंतर जेव्हा मुलगी आपल्या सासरी जाते. तेव्हा तिला सासरकडील मंडळीशी जुळवून घ्यावे लागते. मुलगी सासरी जातांना तिच्या स्वजनांच्या भावना, जिव्हाळा, प्रेम अनेक गीतामधून व्यक्त होतांना दिसतो. तसेच विवाह प्रसंगी लोकगीतामधून आनंद व्यक्त होतांना दिसतो. पारधी जमातीमधील अशाच एका गीतामधून देवी देवतांकडे स्तुती, महिमा दर्शन व विधीची माहिती प्राप्त होते.

''हरेला बोकडा रे
तू तो एक टेकडा चारो चारीयाचो, हटेला बोकडा
.....तारे शिंगडान बणायी पावळी, हटेला बोकडा
आवी मोरी तारे खुरीन बणायी बकरी,
हटेला बोकडा, ओवी मोरी ............''

या गीतामधून देवी म्हणजे स्त्री ही शक्तीचे रूप असून ती संहारक आहे. दैत्याला मारल्यानंतर त्याच्या उर्वरित अवशेषाचा भाग राहू नये म्हणून देवीने त्याच्या अवशेषांचे पुजाविधीतील पवित्र वस्तुमध्ये रूपांतर केले. यातील 'हटेला बोकड' हा दैत्याचे प्रतिक आहे.

पुढील गीतामधून स्त्री स्वभावातील हट्टीपणा, रूसवे,फुगवे, लडीवाळपणा याचंही मनोवेधक चित्र पाहावयास मिळते.

'' तुम्ही जाशा बाजाराला मै मांग येशू ।
तुम्ही लिइदा टोपी तर मै लिशू रिबीन।
मारू–गिरू नका काई, मै फुगा पाडसा।

तुमच्या सोबत मी बाजाराला येईन तुम्ही टोपी विकत घेतली तर मी रिबेन विकत घेईन, आणि तुम्ही मला मारले तर मी केसाचा फुगा पाडीन असा हा प्रेमभाव रूसवा फुगवा व विश्वास गीतामधून पहावयास मिळतो.

डॉ. गोविंद गारे म्हणतात, ''आदिवासींच्या जीवनात नृत्याप्रमाणे लोकगीतांचेही महत्वाचे स्थान आहे. त्यांच्यात लिखित वाङ्मयाचा संपूर्ण अभाव असल्यामुळे त्यांची संस्कृतीही त्यांच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या गीतांच्या व कहाण्यांच्या द्वाराच टिकून राहिली आहेत.''

नृत्य हे आदिवासींचे अभिन्न अंग आहे. शहरी, नागर जीवनापेक्षा त्यांचे जीवन वेगळे आहे. आदिवासी कवींनी आपल्या काव्यातून व्यवस्थेशी भांडण, चीड, आपल्या दारिद्र्याची कारणमिमांसा,

निसर्गावरील प्रेम, स्वमधील आत्मभान, संघटनेची आवश्यकता व नवा आशावाद घेवून निर्माण झालेली दिसते. पुढील काव्य पंक्ती आदिवासींची विपन्नावस्था कथन करणारी आहे.

''पोटं आत गेलेली,
भिरभिरणाऱ्या डोळयांनी
आणि भयभित नजरेनी पाहणारी
तोंडाला कुलूप लावलेली
ती सारी मरतुकडी माणसं
कुडीत जीव आहे,म्हणून उभी होती''

आदिवासींची अवस्था गोविंद गारे या कवींनी 'त्यांना भेटलो तेव्हा' या कवितेत चित्रित केली आहे. त्याचप्रमाणे कवी विनायक तुमराम म्हणतात,

''डोंबरी वारोली, पोटाची भाकर
वल्डलांचा घेर, कमदेशी ।।'' अशा प्रकारची स्थिती कवी वर्णन करतात.

आदिवासी अन्न, फळे, पाने, फुले, ससे इत्यादी प्राण्यांच्या शिकारीसाठी जंगलामध्ये भाकरी करीत असतात. प्रसंगी त्यांना मृत्यूशी सामनाही करावा लागतो. वर्तमान स्थितीमध्ये श्रीमंत गरिबांचे शोषण करतो. दुर्बलांवर अन्याय अत्याचार होत असतो. राज्यकर्ते कसे आदिवासींवर अत्याचार करतात ते वाहरू सोनवाने यांच्या कवितेतून प्रतित होते. ते सांगतात,

'कायदयाचे मायबाप
तुटलेल्या धाग्यांना गाठ मारून
पोळयाच्या जाडयाप्रमाणे जीवजंतू दुर्बलांना अडकविण्यासाठी''

तर दुसऱ्या एका कवितेमध्ये कवी भुजंग मेश्राम म्हणतात,

' गाव बांधनी म्हणजे एवढं ि ाकाचं हाये
यवस्थेच्या छताडयावर या आग्या मोहोळावानी बसाचं हाये।''

व्यवस्थेने आम्हाला गुलाम केले ही खंत त्यांची आहे. आजही छडवणूक सुरूच आहे. यास्तव संघटन करून लढा दयावा लागेल हा इशारा ते देतात.

कवयित्री उषाकिरण आत्राम यांच्या कवितेतून सुदृढता, सबलीकरण ही काळाची गरज आहे सहनशिलता व सोशिकता काही उपयोगाची नाही म्हणून ती म्हणते,

''तू विद्रोहाचा अंगार हो पळसाच्या तांबडया फुलाप्रमाणे
तू रातराणी होवू नगं व्हशील तर पयसाची लाल तांबडी आग व्हयं,
नाय तं बिब्याची फुलं व्हयं।''

आदिवासी कवींची कविता निसर्गाच्या सान्निध्यामध्ये आकारास येते. त्यांचे निसर्गावर आत्यंतिक प्रेम आहे. म्हणूनच कवी विनायक तुमराम यांच्या 'राणगर्भातील जखमा' या काव्यसंग्रहातून आदिवासींचे प्रखर जीवन प्रगट केले आहे. पूर्वसुरीने त्यांचे आयुष्यात काटे अंथरलेले आहेत. आयुष्य संथ आणि निराशमय झाले. ते लिहितात,

''वेळवाच्या गर्द रांजीखाली किंवा मोहपळसाच्या झाडाखाली वेलीचा पाळणा बांधून पोटच्या तान्हुल्यास हलके हलके झोके देत झुकविणारी आदिवासी माय (आदिवासी माय )

स्त्रिया वाढल्या भाकरीचे चटणीसोबत दोन घास घेवून खळखळणाऱ्या नाल्याचे पाणी पिऊन आपल्या तान्हुल्यास निसर्गाच्या हवाली करून आई मोहाच्या, चारोळयांच्या, टेंबराचा शोध घेत रानात निघून जाते. मिळालेले पदार्थ घेवून ती बाजारात जाते. त्या बाजारात देखील ती कशी नागवली जाते. तीचे कशाप्रकारे शोषण होते याचे वर्णन पुढील काव्य पंक्तीवरून आपल्या निदर्शनास येईल.

''केवळ शेरभर मिठासाठी दोन पायल्या चारोळया
अन् छटाकभर जिरा, हळदीसाठी पायलीभर मोहडोंबरी (आदिवासी माय)

अंधश्रद्धा, दारिद्रय, जातीभेदामुळे आदिवासी समाज हा पुरता रसातळाला गेला. त्याला स्वत:च्या संस्कृतीचे पराभूत तत्वज्ञान स्वीकारून घ्यावे लागले परंतु यामधून सारे बाजुला ठेवून संघटित प्रश्नांचा मुकाबला केल्याशिवाय तरणोपाय नाही. ही जाणीव पुढील कडव्यातून व्यक्त होते.

''जातीय विषमतेची पाखरे,
अजुनही माणसात नांदतात सुखाने
हळू–हळू पाने जाळली स्वजातीची
पहिल्या भेगा स्वत:च्या सत्तेचाळीस जमा
मला लढायचे आहे यादवी युध्द

सत्तेचाळीस तुकडयांना पुरोगामी करण्यासाठी आज सामाजिक एकात्मतेची गरज वरील काव्य पंक्तीमधून प्रकट झाली आहे.

स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षांनंतरही आदिवासींची अवस्था बिकट आहे. याच देशातील ऐतखाऊ भांडवलदार, नोकरदार, व्यापारी, सुखी आहे पण यांच्या वाटयाला जिणे लाजीरवाणे झाले आहे. ते पुढील कवितेमधून दृष्टीस पडेल.

''स्वातंत्र्याच्या पडल्या आहुती कालभिरडे घोळण्यासाठी
लाज वाटावी नंगे पाहुनी लुगडयांना सतरा गाठी''

कवी प्रा.माधव सुरकुंडे स्वातंत्र्याबद्दलची चिड व्यक्त करतांना त्यांच्या लेखणीतून पुढील भावना व्यक्त होतात.

''कुठल्या स्वातंत्र्याची गोश्ट करतोस तू?
ज्याला तू स्वातंत्र्य समजतोस
मी त्याला हिडीस हेळणा समजतो
जिथे मुठभर मवाली खातात पोटभर मेवा
सरकारी दुधावर पोसला जातो गुंडाचा थवा
चोरांना मिळतो तस्करीचा राश्ट्रीय परवाना
स्वार्थाच्या गर्दीत चेंगरते समतेची भावना''

आपल्या देशात फक्त नावालाच लोकशाही उरली आहे सर्व अभिजन वर्ग आदिवासींचे शोषण करीत आहे. ही खंत व्यक्त होते.

'म्होरकी' या कवितेमध्ये उषाकिरण आत्राम म्हणतात,

''सख्यांनो सावध व्हा गं पोरिंनो।
मी तुमची म्होरकी आहे.

फेकून घ्या फाटक्या पदराचे बुजगावणे,
सोडून फेका—बंदीस्त माळांचे जोखाडणे
नजरेतील भीती टाकून घ्या।
ही घ्या पेटती मशाल।
मी निघाले पाठिमागून तुम्ही या ।

असा निर्वाणीचा इशारा कवयित्री देतात.

आज बिरसामुंडा सारख्या महानायकाची आवश्यकता आहे. तोच आमची दैनावस्था दुर करू शकेल हा आशावाद भुजंग मेश्रामांच्या कवितेतून प्रकट होते.

''लोक तुझी वाट पाहत आहेत
ज्या खडतर वाटेने तू निघून गेलास
ती पायवाट आजचा राजमार्ग झालीय
तूझ्या आठवणीसारंखाच '' (उलगुलाल, १९९० पृष्ठ ३०)

एकूणच आदिवासी हा या देशातील व्यवस्थेचा बळी पडलेला आहे. त्याच्या घामाला मोल नाही. जगण्यात नवलाई नाही. जंगलाच्या कडेकपाळीत आपली राहुटी शोधण्यात स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षानंतरही त्याचे प्रयत्न सुरूच आहेत. शिक्षण, आरोग्य, आधुनिकता, अंधश्रद्धा अशा विविध समस्यांच्या विळख्यात तो जीवन व्यापन करीत आहे. व्यवस्थेला त्यांचे प्रश्न नाहीत असे नव्हे. पण हा गुंता सोडविण्याचा प्रयत्न अगदी तोडका आहे. आम्हाला धर्माची गंभीर भाषा समजत नाही पण मानवता धर्माचे आचरणावर आमचा विश्वास आहे. आमचे होणारे शोषण थांबवून समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी त्यांचे प्रयत्न अव्याहत सूरू आहेत. या मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी बहुसंख्य आदिवासी साहित्यिक कवींच्या प्रयत्नांची वाटचाल सुरू आहे.

**संदर्भ :—**


१. पोपट सातपुते, भास्कर शेळके, मिलिंद उसळे, संपादक 'चळवळ आणि साहित्य' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००९ पृष्ठ १५५
२. आदिवासी लोकगीतातील स्त्री जीवन, डॉ. अल्का हिवाळे, कैलास पब्लीकेशन औरंगाबाद, २००२
३. वारली लोकगीत 'एक होता राजा' डॉ. सरोजिनी बाबर
४. कालभूत पुरूशोत्तम 'लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन' विजय प्रकाशन, नागपूर २००७.
५. डॉ. विनायक तुमराम ' शतकातील आदिवासी कविता' हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर पृष्ठ ११
६. डॉ. वि. स. जोग, 'रानगर्भातील जखमा' प्रस्तावना पृष्ठ ६.
७. भुजंग मेश्राम 'उलगुलाल' १९९० पृष्ठ ३०